महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जावक क्रमांक : तंशिविकापु/तिति/महाडीबीटी/२०२०-२१/ 671 दिनांक : ०९.०२.२०२१

09 FEB 2021

परिपत्रक

प्रति,
संचालक/प्राचार्य,
तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील
सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित / खाजगी विनाअनुदानित संस्था
पुणे विभाग.

विषय : महाडीबीटी पोर्टलद्वारे वितरीत होणा-या शिष्यवृत्ती संदर्भात..
संदर्भ : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे परिपत्रक
जा.क्र. १८/तंशिसं/डीबीटी/२०२०-२१/विकाप/४४ दिनांक ०८.०२.२०२१.

उपरोक्त विषयास अनुसरुन, संदर्भीय पत्राद्वारे प्राप्त निर्देशानुसार या विभागीय कार्यालयांतर्गत येणा-या सर्व संस्थांना खालीलप्रमाणे सूचित करण्यात येते की, आपल्या संस्थेमध्ये शिक्षण घेणा-या ज्या विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवरून शिष्यवृत्तीसाठी अर्ज केलेला आहे व ज्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती मंजूर केलेली आहे, तथापि तांत्रिक कारणास्तव अथवा आर्थिक तरतूद उपलब्ध नसल्याच्या कारणास्तव अद्यापपर्यंत ही शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांस मिळू शकलेली नाही, अशा विद्यार्थ्यांना संस्थांनी शैक्षणिक शुल्क भरण्यासाठी तगादा लावू नये. तसेच या विद्यार्थ्यांची गुणपत्रिका रोखून ठेवण्यात येऊ नये.

सर्व संस्थांनी उपरोक्त सूचनेचे पालन अतिशय काटेकोरपणे करावे, जेणेकरुन या प्रकारच्या कोणत्याही तक्रारी या विभागीय कार्यालयास प्राप्त होणार नाहीत.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे